महा मेट्रो

PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

## पुणे मेट्रोच्या ८ स्थानकांवर पार्किंगची सुविधा लवकरच उपलब्ध होणार



पुणे मेट्रोने पिंपरी चिंचवड मेट्रो स्थानक, संत तुकाराम नगर मेट्रो स्थानक, फुगेवाडी मेट्रो स्थानक, बोपोडी मेट्रो स्थानक, शिवाजीनगर मेट्रो स्थानक, सिविल कोर्ट मेट्रो स्थानक, मंगळवार पेठ (आरटीओ) मेट्रो स्थानक, आयडियल कॉलनी मेट्रो स्थानक येथे दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे व त्या पार्किंगच्या संचलनासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

**स्थानक, जागा व अंदाजे पार्किंग क्षमता पुढीलप्रमाणे**:

| Sr. No. | स्थानक | जागा (sq m) | पार्किंग क्षमता |
|---|---|---|---|
| 1 | PCMC Station | 1,500 | चारचाकी: 30, दुचाकी: 60 |
| 2 | Sant Tukaram Nagar | 4,000 | चारचाकी: 60, दुचाकी: 78, सायकल: 42 |
| 3 | Phugewadi | 530 | दुचाकी: 27 |
| 4 | Bopodi | 200 | दुचाकी: 98 |
| 5 | Shivaji Nagar | 680 | चारचाकी: 20, दुचाकी: 110, सायकल: 112 |
| 6 | Civil Court | 880 | चारचाकी: 51, दुचाकी: 122 |
| 7 | Mangalwar Peth/ RTO | 370 | दुचाकी:73 |
| 8 | Ideal Colony | 400 | दुचाकी: 50 |

या सर्व पार्किंग मध्ये बूम बॅरियर, कॉंक्रीट फ्लोरिंग, लाईट, सीसीटीव्ही कॅमेरा ई. सुविधा देण्यात आल्या आहेत या व्यतिरिक्त अँपद्वारे बुकिंग, डिजिटल पेमेंट, पार्किंग क्षमता दर्शविणारे डिजिटल बोर्ड ई. सुविधा असणार आहेत. त्याचप्रमाणे मेट्रो मधून प्रवास केलेले वैध तिकीट असल्यास त्या प्रवाश्याना पार्कींगच्या दरामध्ये २५ % सूट मिळेल आणि महिन्याचा पार्किंग पास सुविधा उपलबध करून देण्यात येणार आहे.

**पार्किंग शुल्क (जीएसटीसह) खालीलप्रमाणे असेल (रुपयांमध्ये):**

| वेळ | सायकल | दुचाकी | चारचाकी | बस / हलके व्यावसायिक वाहन (गैर-कार्यरत तास) |
|---|---|---|---|---|
| २ तासांपर्यंत | 2 | 15 | 35 | 50 |
| २ ते ६ तासांपर्यंत | 5 | 30 | 50 | 70 |
| ६ तासापेक्षा जास्त | 10 | 60 | 80 | 100 |
| मासिक पास | Bidder can offer monthly subscription passes, provided User is holding a valid metro travel pass for the subscription period. | | | |

वरील पार्किंग शुल्क जीएसटी रकमेसह आहे. पुणे मेट्रोने त्याच दिवशी जारी केलेले वैध मेट्रो तिकीट धारण केलेल्या वापरकर्त्यांना मार्गिका -1 (पर्पल लाईन) आणि मार्गिका -2 (एक्वा लाईन) वरील सेवांसाठी पार्किंग शुल्कावर 25% सवलत दिली जाईल. मूळ / समाप्त होणारे स्टेशन हे मेट्रो स्थानक असेल ज्यावर विशिष्ट पार्किंगची जागा आहे.

तसेच तासाप्रमाणे पार्किंग सुविधेसह मासिक सदस्यता पासची सुविधा उपलब्ध आहे. जर वापरकर्त्याने सबस्क्रिप्शन कालावधीसाठी वैध मेट्रो प्रवास पास धारण केला असेल. ज्या प्रवाशांना पार्किंगच्या ठिकाणी हेल्मेट ठेवायचे आहे त्यांना २४तासांसाठी 5  रुपये असे नाममात्र हेल्मेट शुल्क असेल.

याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर म्हंटले की, "आठ मेट्रो स्थानकांवर पार्किंग सुविधा उपलब्ध केल्याने मेट्रो प्रवाशांना नक्कीच फायदा होईल"





